मार्गदर्शक पुस्तिका क्र. 1

(मॅन्युअल - 1)

कार्यालयाचा तपशिल, कामकाज आणि कर्तव्ये

संस्थेचे वैशिष्टये, कार्ये व कर्तव्ये

सार्वजनिक बगिचे, उद्याने किंवा करमणुक केंद्रें (जलरतण तलाव) परिरक्षित करणे हे सन 1888 च्या मुंबई अधिनियम क्र. III बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम (31 मे 1995 पर्यंत सुधारणा केल्यानुसार) कलम 63 (ड) अनव्ये स्वच्छाधिन कर्तव्य आहे.

महानगरपालिकेच्या जलतरण तलावामध्ये पोहणारे व पोहण्यास परवानगी देऊन सर्वसाधारण जनतेचे मनोरंजन करण्याचे कार्य बृहन्मुंबई महानगरपालिका करीत आहे.

सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलाव, कांदिवली हा जलतरण तलाव सन 1971 पासून सुरु झाला आणि दरवर्षी 6847 सभासद या जलतरण तलावाचा फायदा घेत आहेत. या जलतरण तलावाच्या मागील बाजूस असलेले मोकळे मैदान जनतेसाठी, भाडे तत्त्वावर विविध कार्यक्रमासठी उपलब्ध करुन देण्यात येते.

**<u>आकृतिबंध रचना</u>**

महानगरपालिका आयुक्त

↓

अति. महानगरपालिका आयुक्त

↓

सह आयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन)

↓

सहाय्यक व्यवस्थापक

↓

लिपिक कर्मचारी /तांत्रिक व अतांत्रिक  कामगार

सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलावाच्या कार्यालयात, पुरविण्यात येणा-या सेवेचे नियंत्रण व सभासदांच्या गाऱ्हाण्यांसाठी तक्रार नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. वेळोवेळी सभासद व जनतेकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेण्यात येते. प्राप्त झालेल्या तक्रारीतील तथ्यानुसार देण्यात येणाऱ्या सेवेत सुधारणा व जनतेची गाऱ्हाणी सोडविण्याची काळजी घेण्यात येते. उचित कार्यवाहीसाठी आणि निर्णयासाठी आवश्यकतेप्रमाणे संबंधित अधिका-यांकडे तक्रारी अग्रेषित करण्यात येतात.